दि. 24.09.2026

**प्रेसनोट**

**लातूरात दोन ठिकाणी जुगार अड्ड्यांवर पोलीस उप महानिरीक्षक यांच्या यांच्या पथकाच्या धाडी**

**(20) इसमांविरुध्द कारवाई, 27 लाखांचा मुद्देमाल जप्त**

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी आपल्याकडील अधिकारी व अंमलदारांचे एक पोलीस पथक लातूर जिल्हयात रवाना केले होते.

सदर पथकाने, दिनांक 23.09.2026 रोजी देवणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवाजी निवृत्ती सगर यांचे शेतात तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत, 9,330/-रुपयांची रोकड, (9) मोबाईल, (2) चारचाकी वाहने व (2) मोटार सायकली असा एकूण 15,93,830/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण (9) इसमांविरुध्द कारवाई करुन, त्यांचेविरुध्द देवणी पोलीस ठाणे येथे गुरनं 326/2026 कलम 12 (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदवला आहे.

तद्नंतर, पथकाने लातूर शहरातील गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीतील अशोका बार ॲन्ड लॉज येथील रुममध्ये तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत, 1,77,910/-रुपयांची रोकड, (13) मोबाईल, (1) चारचाकी वाहन व (4) मोटार सायकली असा एकूण 11,17,910/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण (11) इसमांविरुध्द कारवाई करुन, त्यांचेविरुध्द गांधी चौक पोलीस ठाणे येथे गुरनं 663/2026 कलम 12 (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदवला आहे.

उपरोक्त दोन्हीही कारवायांत, पथकाने एकूण (20) इसमांकडून 1,87,240/- रुपयांची रोकड, (22) मोबाईल, (3) चारचाकी वाहने व (6) मोटार सायकली असा एकूण 27,11,740/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/ गणेश राठोड, पोहेकॉ/ संदिप वाघाडे व पोहेकॉ/ गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

**' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड